सांज दैनिक बीड
RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

यशस्वी २० वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट



## न्यायालयाकडून मनाई, मनोज जरांगेंची भूमिका काय?

'वकील न्यायालयात जातील ते आमचे म्हणणे मांडतील. आमचे मुंबईतील वकील सज्ज आहेत. न्यायदेवता आमचे म्हणणे ऐकून परवानगी देईल. शांततेत आंदोलन हा लोकशाहीचा आणि राज्यघटनेने दिलेला अधिकार आहे. न्यायदेवता न्याय करील हा आम्हाला विश्वास आहे. आमच्या कायदेशीर मागण्या आहेत. 29 ऑगस्टला मी आझाद मैदानावर उपोषणाला बसणार आहे,' असे मराठा आरक्षण आंदोलक मनोज पाटील जरांगे यांनी मंगळवारी अंतरवाली सराटी (ता.अंबड) येथे सांगितले.

**बीड : प्रतिनिधी**
मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळावं, या मागणीसाठी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे मुंबईकडे निघाले आहेत. मुंबईतील आझाद मैदान इथं 29 ऑगस्टपासून आमरण उपोषण करणार असल्याची घोषणा जरांगे पाटलांनी केली आहे. जरांगे यांच्यासोबत त्यांचे हजारो समर्थक जालना ते मुंबई या प्रवासासाठी निघाले असल्याने पोलीस प्रशासनही अलर्ट झाले असून जालन्यातील अंतरवाली सराटी इथून निघण्याआधी पोलिसांनी मनोज जरांगे यांना 40 अटींचं पत्र दिलं आहे. जालना ते मुंबई या प्रवासात जरांगे पाटील आणि त्यांच्या समर्थकांना या अटींचं पालन करावं लागणार आह.

### तेरा महिने झाले, तरी समिती अभ्यासच करतेय!

'इंग्रजांच्या काळात उपोषण झाले, मात्र देवेंद्र फडणवीस यांच्या काळात होत नाही, हे मोठे दुर्दैव आहे. शिंदे समितीला पहिलीच वाढ दिलेली आहे. त्यांचा काही उपयोग होत नाही. मुदतवाढ देऊन दीड महिना झाला. शिंदे समितीकडून नोंदी शोधल्या जात नाहीत, नुसती मुदतवाढ देतात. तेरा महिने झाले, तरी समिती अभ्यास करीत आहे,' अशी टीका जरांगे यांनी केली.

# मनोज जरांगे पाटील यांची मुंबईकडे कूच, पण जालना पोलिसांनी हातात 40 अटींचं पत्र सोपवलं!!

'इंग्रजांच्या काळात उपोषण झाले, मात्र देवेंद्र फडणवीस यांच्या काळात होत नाही, हे मोठे दुर्दैवं!!

जरांगे यांच्यासोबत त्यांचे समर्थक जालना ते मुंबई या प्रवासासाठी निघाले असल्याने पोलीस प्रशासनही झाले अलर्ट

शांततेत आंदोलन हा लोकशाहीचा आणि राज्यघटनेने दिलेला अधिकार असून न्यायदेवता न्याय करेल हा विश्वास!!

### जालना पोलिसांकडून जरांगेंना कोणत्या अटी?

1. अंतरवाली सराटी-मुंबई या प्रवासामध्ये कोणाकडूनही आक्षेपार्ह घोषणा आणि जातीय तेढ निर्माण करणारी वक्तव्ये होणार नाहीत, याची काळजी घ्यावी.
2. जालना-मुंबई प्रवास हा आधी घोषित केलेल्या मार्गानेच करण्यात यावा. या मार्गात बदल केले जाऊ नयेत.
3. मोर्चेकऱ्यांसह प्रवास करताना अत्यावश्यक सेवा पुरवणारी वाहने, यामध्ये ॲम्ब्युलन्स, अग्निशमन दलाची वाहने आदी वाहने आणि रहदारी विस्कळीत होणार नाही,
4. आंदोलकांकडून खासगी व सार्वजनिक मालमत्तेचं नुकसान झालं तर त्याची भरपाई देण्याची जबाबदारी आयोजक व आंदोलनकर्ते यांची राहणार आहे
5. मोर्चात सहभागी होणाऱ्या लोकांनी कोणतेही घातक शस्त्र, काठी, तलवार, लोखंडी गज, दगड बाळगू नयेत.

40 अटी — दरम्यान, वरील महत्त्वपूर्ण अटींसह एकूण 40 अटी पोलीस प्रशासनाकडून लादण्यात आल्या आहेत

## अंबाजोगाई येथील रायगड नगर येथे तरूणाची सपासप वार करून हत्या






**अंबाजोगाई : प्रतिनिधी**
राज्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीचं प्रमाण वाढत चाललं आहे. त्यातल्या त्यात पुणे आणि बीड जिल्हा अव्वल आहे. याठिकाणी दररोज काही ना काही घटना घडत असतात. अशीच एक धक्कादायक घटना बीड जिल्ह्याच्या अंबाजोगाई शहरातील रायगड नगर येथे घडली आहे. अविनाश शंकर देवकर (वय ३५) याची तीक्ष्ण हत्याराने वार करून हत्या करण्यात आली आहे. ही धक्कादायक घटना रात्री साखर कारखाना रोडवरील हॉटेल दरबार येथे घडली असल्याचं समोर आलं आहे.

**हल्ल्यात तरूणाचा जागीच मृत्यू; तर घटनेनंतर आरोपी पसार**
सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अज्ञात आरोपींनी दरबार हॉटेलमध्ये बसलेल्या अविनाशच्या डोक्यात तीक्ष्ण हत्याराने सपासप वार केले. या हल्ल्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपी पसार झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

दरम्यान, ही हत्या कोणी आणि कोणत्या कारणास्तव केली हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेलं नाही. अविनाश देवकर यांचा मृतदेह स्वाराती रुग्णालयात आणण्यात आलं असून पुढील तपास अंबाजोगाई शहर पोलीस करत आहेत. या घटनेने अंबाजोगाई शहरात खळबळ उडाली आहे.

**डोक्यात तीक्ष्ण हत्यारानं वार**
मिळालेल्या अधिकच्या माहितीनुसार, अज्ञात आरोपींनी दरबार हॉटेलमध्ये बसलेल्या अविनाशच्या डोक्यात तीक्ष्ण हत्याराने अचानकपणे सपासप वार केले. या हल्ल्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपी पसार झाला. यावेळी घडलेली घटनेची माहिती शहर पोलिसांना देण्यात आली, ही माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

## डॉ. मेघाताई डहाळे राष्ट्रीय भारत भूषण पुरस्काराने सन्मानित

**आष्टी : प्रतिनिधी**
महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीत कार्यरत असणाऱ्या व विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तुत्ववान व्यक्तींच्या कार्याचा सन्मान सोहळा, सर्वांच्या सेवेसाठी महाराष्ट्राच्या हितासाठी नवतरुणांनी चालवलेली राज्यव्यापी सामाजिक चळवळ सामाजिक चळवळीचा मानबिंदू साऊ ज्योती सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कार सोहळा नुकताच पुण्यात आयोजित करण्यात आला होता. यात महाराष्ट्राच्या हितासाठी सर्वांच्या सेवेसाठी कार्यरत असलेल्या, साऊ ज्योती सामाजिक फाउंडेशन यांच्या वतीने सामाजिक चळवळीच्या मानबिंदु राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कार वितरण सोहळा नुकताच भारत इतिहास संशोधन मंडळ सदाशिव पेठ पुणे येथे पार पडला.

या सोहळ्यात अहिल्यानगर येथील रहिवासी डॉ.मेघाताई संतोषराव डहाळे यांचा रविवार दि. २४ ऑगस्ट रोजी विद्येचे माहेरघर असणाऱ्या पुणे शहरात राष्ट्रीय भारत भूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला. या सन्मानाबद्दल त्यांच्यावरती विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी कडून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे. या मिळालेल्या सन्मानाने माझी सामाजिक जबाबदारी वाढली आहे. हा पुरस्कार



माझ्यासाठी येत्या काळात अधिक जोमाने काम करण्यासाठी नवी उर्जा प्रोत्साहन पाठबळ देणार आहे. अशी भावना डॉ. मेघाताई डहाळे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून बाळराजे ● पान ४ वर...

**समितीची बैठक शांततेत...** तहसीलदार नवनाथ वागवड, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश पालवे, पोलीस निरीक्षक कुमारसिंग राजपूत आदिची उपस्थिती

## गंगापूरला गणपती व ईदच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीची बैठक संपन्न

गंगापूर : गुलाब वाघ
गंगापूर तहसिल कार्यालयात गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद २०२५ या पारंपरिक सणांच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक पार पडली. दोन्ही सण शांततेत, उत्साहात व सौहार्दपूर्ण वातावरणात साजरे व्हावेत यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना निश्चित करण्यात आल्या.

बैठकीस तहसीलदारनवनाथ वगवाड, प्रभारी तहसीलदारसागर वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारीडॉ. निलेश पालवे, नायब तहसीलदारसचिन वाघमारे,



उपनिरीक्षकअनिल झोरे, डॉ. स्वप्नील लगाने, गोपनीय शाखेचे मनोज नवले, नगरपरिषद अधिकारी, विविध धार्मिक संस्था तसेच मंडळांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत मिरवणुकीचे मार्ग, ध्वनीक्षेपकांचा योग्य वापर, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, वीजपुरवठा या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळीडिजे वापरास संपूर्ण बंदी असल्याचे स्पष्ट करण्यात आले. पारंपरिक वाद्यांच्या सहाय्यानेच मिरवणुका काढाव्यात, असे प्रशासनाने आवाहन केले.

धार्मिक संस्था, मंडळ पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या निर्णयाचे स्वागत केले. सण हा एकतेचा, बंधुत्वाचा आणि




आनंदाचा असतो; त्याला गोंधळाचे स्वरूप येऊ नये यासाठी नियम पाळणे आवश्यक आहे, असे मत बहुतेक उपस्थितांनी व्यक्त केले. उपविभागीय य पोलीस अधिकारीडॉ. निलेश पालवे यांनी सांगितले की, "गणेश उत्सव आणि ईद-ए-मिलाद या दोन्ही सणांच्या काळात ● पान ४ वर...

### डीजे वापरास संपूर्ण बंदी पण डीजे चालकांची बैठकीला दांडी, पोलिसांच्या नाकावर टिच्चून वाजणार हिंदी मराठी चित्रपटातील बिभत्स गाणी?

मोठा गाजावाजा करून शांतता कमिटीची बैठक पार पडली असली तरी या शांतता कमिटीच्या बैठकीला काही डीजे मालक व चालक यांची अनुपस्थिती होती त्यामुळे गंगापूर तालुक्यात आगामी गणपती व नवरात्रउत्सव यामध्ये सालाबादप्रमाणे पोलिसांच्या नाकावर टिचून हिंदी व मराठी सिनेमांच्या गाण्यावर डीजेचा कर्णकर्कश आवाजाचा धिंगाणा होणारच आहे त्यामुळे पोलीस यावर काय कारवाई करणार हा प्रश्न मात्र अनुत्तरीतच आहे त्यामुळे डीजे चालकांनी बैठकीला दांडी मारल्याने पोलिसांच्या नाकावर टिच्चून हिंदी मराठी चित्रपटातील बिभत्स गाणी वाजणारच आहे मात्र गंगापूर पोलिसांनी डीजे चालकांना लेखी सूचित केले असेल तर पोलिसांकडे कारवाईचा मार्ग मोकळा असेल अन्यथा डीजेवाल्यांचा मार्ग मोकळा असेल असे दिसते.

## तुमच्या राशींसाठी आजचा दिवस कसा असेल, जाणून घ्या



**मेष रास** ➤ मेष राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

**वृषभ रास** ➤ वृषभ राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

**मिथुन रास** ➤ मिथुन राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल.

**कर्क रास** ➤ कर्क राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो.

**सिंह रास** ➤ सिंह राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल.

**कन्या रास** ➤ कन्या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल.

**तूळ रास** ➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल.

**वृश्चिक रास** ➤ वृश्चिक राशीचे राशीचे आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल.

**धनु रास** ➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

**मकर रास** ➤ आजचा दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

**कुंभ रास** ➤ कन्या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**मीन रास** ➤ मीन राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

# 1972 मध्ये कापूसाला भाव सोन्याएवढा, आज मात्र कांद्यासारखा ...शेतकऱ्याला न्याय्य भाव कधी?

शेतकऱ्याच्या मेहनतीला दरवाढ नाही, तर इतर सगळ्या क्षेत्रांना आयोग आणि सुविधा. कृषी मूल्य आयोग हा केवळ नावापुरता, पण खरी गरज आहे न्याय्य किमतीची. 1972 साली आपल्या देशात कापसाची किंमत आणि सोन्याची किंमत यांच्यात एक अनोखी बरोबरी होती. त्या वेळी 1 क्विंटल कापूस = 1 तोळा सोनं होता. म्हणजे शेतकरी जर 1 क्विंटल कापूस विकला, तर त्याला त्याच्या मोबदल्यात 1 तोळा सोनं घेता येत होतं.





शेतकऱ्याचं जीवनमान शहरातील लोकांच्या बरोबरीला आलं असतं. पण दुर्दैव असं की आज शेतकऱ्याला जीव तोडून मेहनत करूनही पोटभर भाव मिळत नाही

## कृषी मूल्य आयोग हा केवळ नावापुरताच...

आज 50 वर्षांनंतर सोन्याचा भाव झपाट्याने वाढून ₹1,00,000 प्रति तोळा झाला आहे. पण कापसाचा भाव मात्र फक्त ₹6,000–₹6,500 प्रति क्विंटल इतकाच आहे.

इथं सगळ्यात मोठं अन्यायाचं चित्र दिसतं. नोकरदारांना वेळोवेळी सातवा वेतन आयोग लागू होतो, ज्यामुळे त्यांचे पगार वाढतात. इंधन, वीज, डिझेल, पेट्रोल, घरगुती वस्तू, सौंदर्यप्रसाधने, सर्वच गोष्टींचे भाव प्रचंड वाढले. शहरी लोकांच्या पगाराच्या जोडीला महागाई भत्ता (DA) असतो, जेणेकरून खरेदीशक्ती कमी होऊ नये. पण शेतकऱ्याला दिलेला कृषी मूल्य आयोग हा केवळ नावापुरता आहे. तोही राजकीय हस्तक्षेपाखाली राहिला. त्यामुळे शेतीमालाला बाजारात योग्य दर कधीच मिळाला नाही.

## जर भाव सोन्याबरोबर वाढला असता...

जर 1972 च्या तुलनेत कापसाचा दर सोन्यासारखाच वाढला असता, तर आज कापूस ₹1,00,000 प्रति क्विंटल विकला गेला असता. याचा अर्थ असा की, शेतकऱ्याला कर्जबाजारी होण्याची वेळ आली नसती. शेतकरी आज आत्महत्या करण्याच्या टोकावर गेले नसते.

गावातील अर्थव्यवस्था आणि ग्रामीण विकास स्वत:च मजबूत झाला असता.

## खरी गरज आहे आता...

आजची परिस्थिती बदलण्यासाठी काही गोष्टी आवश्यक आहेत

1. कृषी मूल्य आयोगाला स्वतंत्र व कार्यक्षम अधिकार द्यावे.
2. शेतमालाचा खर्च + नफा + बाजारभाव या सूत्रावर दर ठरवावा.
3. शेतमाल विक्रीसाठी शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ मिळावी.
4. शेतमालाच्या किमतींचं सोनं, इंधन, आणि महागाईशी नातं जोडून भाव ठरवला गेला पाहिजे.

## न्याय्य भावाचा अधिकार द्यायलाच हवा

विशेष



श्रद्धा रघुनाथ यादव
(गंगाखेड)
Shraddhayadav27907@gmail.com)

शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे.

जर त्याच्या उत्पादनाला न्याय्य भाव दिला नाही, तर देशाचं अन्नसुरक्षित भविष्य धोक्यात येईल. आजवर नोकरदार, उद्योगपती, व्यापारी सगळ्यांसाठी आयोग, योजना, सवलती आल्या. पण शेतकरी मात्र रोजच्या रोज बाजारात लुबाडला गेला. 1972 मध्ये कापूस सोन्यासमान होता; आज मात्र कांद्यासारखा झाला आहे.

आता तरी सरकारने शेतकऱ्याला न्याय्य भावाचा अधिकार द्यायलाच हवा.

# सुंदर त्वचेसाठी विटामिन सी सीरम

बाजारामध्ये अनेक वेगवेगळ्या कंपनीचे विटामिन सी सीरम उपलब्ध आहेत. आम्ही आज तुम्हाला कमीत खर्चात विटामिन सी सीरम घरी कसे तयार करायचे याबद्दल सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

सर्वच ऋतूंमध्ये त्वचेची काळजी घेणे फार आवश्यक आहे. योग्य प्रकारे त्वचेची काळजी घेतली नाही तर त्वचा निस्तेज आणि खराब होण्याची शक्यता असते. त्यामुळे उन्हाळ्या व्यतिरिक्त इतरही ऋतूंमध्ये त्वचेची काळजी घेतले पाहिजे. मागील अनेक दिवसांपासून त्वचेला लावले जाणारे विटामिन सी सीरम मोठ्या प्रमाणावर चर्चेत आहे. पण तुम्हाला माहित आहे का विटॅमिन सी लावल्याने नक्की त्वचेला नक्की काय फायदे होतात? बदलत्या वातावरणाचा परिणाम जसा शरीरावर दिसून येतो, तसाच परिणाम त्वचेवरसुद्धा दिसून येतो. योग्य ते स्किन केअर रुटीन फॉलो केले नाही तर त्वचा रुक्ष आणि निस्तेज दिसू लागते. सुंदर चमकदार त्वचा जर तुम्हाला हवीअसेल तर तुम्ही व्हिटामिन सी किंवा ई हे सीरम वापरू शकता. यामुळे त्वचेला फायदे होतात.

विटामिन सी मध्ये अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात ज्यामुळे त्वचेचे फ्री रॅडिकल्समुळे होणारे नुकसान होत नाही. यामुळे कोलेजन उत्पादन वाढते. तसेच बाहेर गेल्यानंतर सूर्यकिरणांपासून होणारे त्वचेचे नुकसान टाळता



येते. बाजारामध्ये अनेक वेगवेगळ्या कंपनीचे विटामिन सी सीरम उपलब्ध आहेत. पण आम्ही तुम्हाला घरच्या घरी कमीत खर्चात विटामिन सी सीरम कसे बनवायचे याची कृती सांगणार आहोत.

अशा पद्धतीने विटामिन सी सीरम तयार करा:

**साहित्य:**

विटामिन सी गोळ्या
विटामिन ई कॅप्सूल
गुलाब पाणी
कोरफड जेल
ग्लिसरीन
काचेची बाटली

**कृती:**

- विटामिन सी सीरम बनवण्यासाठी एका वाटीमध्ये गुलाब पाणी आणि कोरफड जेल घेऊन मिक्स करून घ्या.
- नंतर त्यात विटामिन सी आणि विटामीन ई च्या गोळ्या मिक्स करा.
- विटामिनच्या गोळ्या मिक्स करून झाल्यानंतर त्यात ग्लिसरीन मिक्स करा.
- चमचा घेऊन हे मिश्रण व्यवस्थित मिक्स करून घ्या. त्यानंतर काचेच्या बाटलीमध्ये भरून ठेवा.
- काचेच्या बाटलीमध्ये भरून १ दिवस फ्रिजमध्ये ठेवा.
- हे विटामिन सीरम तुम्ही सकाळी उठल्यानंतर आणि रात्री झोपताना त्वचेला लावू शकता. यामुळे त्वचेचा पोत आणि रंग सुधारण्यास मदत होईल.
- टीप – आम्ही देत असलेली माहिती ही तज्ज्ञांशी बोलून आणि रिसर्च करून देत आहोत. हा लेख केवळ तुमच्या माहितीसाठी लिहिण्यात आला आहे. प्रत्येकाची त्वचा वेगळी असते, त्यामुळे कोणत्याही प्रकारचा उपाय करण्यापूर्वी पॅच टेस्ट करायला विसरू नका.

# ऱोज सकाळी खा **भिजवलेले अक्रोड**

**आजकालच्या लाईफस्टाईलमध्ये अनेकजण कमकुवतपणा आणि थकवा येत असल्याची तक्रार करत असतात. कमकुवतपणा आणि थकव्यामुळे व्यक्तीच्या रोजच्या जीवनातील कामेही प्रभावित होत असतात.**





- थकवा तसेच कमजोरीपासून दूर राहण्यासाठी आपल्याला संतुलित जेवण करणे गरजेचे असते. सोबतच आपल्या डाएटमध्ये काही अतिरिक्त पोषकतत्वांनी भरलेल्या पदार्थांचा समावेश करणेही गरजेचे असते.
- येथे आम्ही तुम्हाला अशा पदार्थाबद्दल सांगणार आहोत ज्याच्या रोजच्या सेवनाने तुम्ही शरीरातील कमजोरी आणि थकवा दूर करू शकता तसेच शरीरात ताकद निर्माण होईल.
- या पदार्थाचे नाव आहे अक्रोड. अक्रोडमध्ये प्रोटीन, फॅट, फायबर, फायटोस्टेरॉल, ओमेगा ३ फॅटी ॲसिड सारखी तत्वे आढळतात जे शरीराला आतून ताकद देतात.
- अक्रोड हा अल्फा लिनोलेनिक ॲसिडचा मोठा स्त्रोत आहे. यात ओमेगा ३ फॅटी ॲसिड मोठ्या प्रमाणात असते. अक्रोडमध्ये आढळणारी पोषकतत्वे ही त्वचेला निरोगी ठेवण्यास मदत करतात. तसेच एजिंगची लक्षणे कमी करतात.
- अक्रोडमध्ये जी अँटी ऑक्सिडंट असतात त्यामुळे हृदय आणि मेंदूचे आरोग्य चांगले राहते.

यामुळे कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते. हृदयरोग आणि कॅन्सरची जोखीम कमी होते.

- अक्रोड वजन कमी करण्यास मदत होते कारण यात आढळणारी पोषकतत्वे मेटाबॉलिज्म वेगवान करण्यात मदत करतात तसेच शरीराची चरबी घटवतात.

# किचनमधील 5 पदार्थ 'अमृता'पेक्षा कमी नाहीत, लिव्हरपासून हार्टपर्यंत व्हाल फिट अँड फाईन

भारतीय स्वयंपाकघरात वापरले जाणारे अनेक मसाले आणि पदार्थ हे खरं तर औषधी वनस्पती आहेत ज्यांचा आयुर्वेदात वर्षानुवर्षे रोगांवर उपचार करण्यासाठी वापर केला जातो. यापैकी काही पदार्थ अमृतसारखे मानले जातात. याबाबत अधिक माहिती घेऊया.

आयुर्वेद ही जगातील सर्वात जुनी वैद्यकीय प्रणाली आहे. यानुसार अन्न हे औषधासारखे आहे असे मानले जाते. आयुर्वेदात सांगितल्यानुसार अन्नाने केवळ भूकच शमते असे नाही तर शरीराला



सक्रिय राहण्यासाठी आणि योग्यरित्या कार्य करण्यासाठी पोषणदेखील मिळते.

आयुर्वेदात औषधी वनस्पतींचा उपयोग मोठ्या आजारांवर उपचार करण्यासाठी केला जातो. विशेष म्हणजे यातील अनेक औषधी वनस्पती आपल्या स्वयंपाकघरातही उपलब्ध असतात. बहुतेक लोकांना या वनस्पतींचे गुणधर्म आणि फायदे माहीत नसले तरी आयुर्वेद तज्ज्ञ या वनस्पतींना अथवा या पदार्थांना अमृत म्हणून परिभाषित करतात. कारण याच्या सेवनाने आजारांना प्रतिबंध तर होतोच पण आयुष्यही वाढते. या लेखात आम्ही तुम्हाला अशाच 5 गोष्टींबद्दल आम्ही सांगत आहोत. आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. माधव भागवत यांनी याबाबत आपल्याला अधिक माहिती दिली आहे.

## आवळा

आवळा हा पदार्थ विटामिन सी ने समृद्ध आहे आणि शरीराच्या नैसर्गिक डिटॉक्सिफिकेशन प्रक्रियेसाठी उपयुक्त आहे. आवळा खाल्ल्याने डोळे निरोगी राहतात आणि वाढत्या वयाचा परिणाम त्वचेवर कमी दिसतो. एनसीबीआयमध्ये प्रकाशित ● पान ४ वर...

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

# हजारो भाविकाचा उपस्थीत चारित्र्य चक्रवर्ती प्रथमाचार्य शांतीसागरजी महाराज यांचा 70वा समाधी महामहोत्सव संपन्न

## शोभायात्रेत आचार्य प्रणाम सागरजी महाराज उपाध्याय विरंजन सागरजी महाराज चर्या शिरोमणी प्रभावसागरजी महाराज यांच्या मंगल सानिध्यामुळे उत्साह

छत्रपती सभाजीनगर : सिडको परिसरातील किर्ती स्तंभ भगवान पार्श्वनाथ चौक या ठिकाणी डॉ.आचार्य प्रणाम सागर जी महाराज उपाध्याय विरंजन सागरजी महाराज तथा चर्या शिरोमणी प्रभावसागरजी महाराज यांच्या मंगल सानीध्यात अमोल जैन मोगले, महावीर पाटणी, विलास साहुजी निलेश सावळकर आदि मान्यवरांचे शुभ हस्ते धर्म ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर लगेचच शोभायात्रेला सुरुवात करण्यात आली शोभा यात्रा जैन मंदिर मार्गे एम २, साधना भवन पवन नगर, टिव्ही सेंटर मार्गे कैलास शिल्प या ठिकाणी विसर्जित करण्यात आली. शोभायात्रेत तिन मुख्य रथा मध्ये आचार्य श्री शांतीसागरजी महाराज यांचे सुंदर छायाचित्र ठेवण्यात आले होते तसेच पंचवीस कारवर आचार्य श्री शांतीसागर महाराज यांचे छायाचित्र व आचार्य श्री चे अहिंसा, जीवदया, वात्सल्य या विषयावर उदबोधनपर श्लोगन लिहिलेले फलक लावण्यात आले होते त्यामुळे आचार्य श्री चा दिव्य संदेश सर्वांपर्यंत पोहचला शोभायात्रेत वारकरी संप्रदाय भजनी मंडळ सुध्दा सहभागी झाले होते महिला पुरुष युवक युवती सर्वांनी आचार्य श्री चा जयघोष करीत परिसरातील वातावरण चैतन्यमय केले होते. सर्व जनमानसात आचार्य श्री चा संदेश शाकाहार अहिंसेचा संदेश देण्यात सर्व जैन बांधव जैनेतर सुध्दा उत्साहात सहभागी झाले होते. शोभायात्रेत आचार्य प्रणाम सागरजी महाराज उपाध्याय विरंजन सागरजी महाराज चर्या शिरोमणी प्रभावसागरजी महाराज यांच्या मंगल सानिध्यामुळे उत्साह






संचारला होता.सिडको परिसरात व शोभायात्रा मार्गावर मोठाले डिजिटल फलक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते कैलास शिल्प या ठिकाणी कार्यक्रमाची सुरुवात आचार्य विद्यासागर पाठशाळा विद्यार्थ्यांनी मंगलाचरण नृत्य सादर करून केले दिप प्रज्वलन विभागीय आयुक्त श्री जितेंद्रजी पापळकर, पोलिस अधीक्षक ग्रामीण डॉ विनयकुमार राठोड,अमोल मोगले, निलेश सावळकर,प्रकाश भाकरे, ललित पाटणी, विलास साहुजी, महावीर पाटणी,अजीत गोसावी, शैलेश रावका आदि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले आचार्य श्री चे पूजन मोठ्या उत्साहात सजविलेल्या पुजन थाळी मध्ये अष्ट द्रव्य घेऊन संगीतमय नृत्य करित प्रगती महिला मंडळ, उन्नती महिला मंडळ,दशाहुम्बड प्रेरणा स्वाध्याय मंडळ,महिला मंडळ राजाबाजार, चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिर हडको,एकता महिला मंडळ हडको,णमोकार महिला मंडळ राजाबाजार,अर्हम महिला मंडळ भाजीबाजार, मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुख नगर, सिडको वाले बडे बाबा जैन मंदिर सिडको यांचें वतीने करण्यात आले .शोभायात्रेत कुंभकळसचा सन्मान संगीता कैलास बाळशेटे यांना प्राप्त झाला आचार्य श्री प्रणाम सागरजी, उपाध्याय विरंजन सागरजी महाराज चर्या शिरोमणी मुनिश्री प्रभाव सागरजी महाराज यांचे पाद प्रक्षालन सुमंगलाताई भास्करराव अन्नदाते परिवारातर्फे करण्यात आले, तर शास्त्र भेट प्रतिमाधारी मिनाताई सनतकुमार साहुजी, जयश्रीताई संतोष सोनटक्के, सिमाताई अशोक ईगंलवार, शुभांगीताई ईगंलवार परिवारातर्फे करण्यात आले. या कार्यक्रमाला आमदार श्री संजयजी केणेकर आमदार श्री प्रदीप जैस्वाल मा.नगरसेवक श्री नितिन चित्ते यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी संजय केणेकर यांनी मनोगत व्यक्त करतांना सिडको हडको भागातील चौकाला आचार्य शांतीसागर चौक हे नांव व त्याचे सुशोभिकरण स्व खर्चाने करुन देण्यात येईल असे घोषित केले व जैन समाजाचे आणि माझे ऋणानुबंध जन्मोजन्मी चे असल्याचे सांगून जुन्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर साहेबांनी तत्वार्थ सुत्र च्या श्लोकाचा संदर्भ घेऊन अभ्यास पूर्वक मार्गदर्शन केले व समाजाच्या कुठल्याही धार्मिक कार्यासाठी माझं सहकार्य निश्चित असतं अशी भावना त्यांनी व्यक्त करुन आगामी दशलक्षण पर्व महोत्सव साठी सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास जोगी जयश्री हुडवेकर निलेश सावळकर गीता भाकरे यांनी केले. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना उपाध्याय श्री विरंजन सागरजी महाराज यांनी समाजाला एकजुटीचे आव्हान करून धर्मरत होण्याचे आवाहन केले चर्या शिरोमणी मुनिश्री प्रभाव सागरजी महाराज यांनी शांतीसागर महाराज यांचे कार्याचे विस्तृतपणे विवेचन केले अहिंसा परमो : धर्म आहे, शाकाहाराचा व व्यसनमुक्ती चा प्रचार प्रसार केला तर धर्मासाठी आपण सुध्दा काहीतरी कार्य केल्याचे समाधान व पुण्य मिळणार आहे .आचार्य शांतीसागरजी महाराज यांचा समाधी सोहळा महोत्सव मोठ्या प्रमाणावर सर्व दिगंबर जैन समाज एकत्र येऊन सर्व मुनिश्री एकाच ठिकाणी येऊन मोठी प्रभावना करण्याची मुनिश्री प्रभाव सागरजी महाराज यांनी ईच्छा प्रगट केली व त्यांचे मार्गदर्शना नुसार या कार्यक्रमाचं आयोजन केले गेले


आचार्य श्री प्रणाम सागरजी महाराज यांनी सुध्दा शांतिसागरजी महाराज यांच्या कार्याची माहिती दिली व तेच दिगंबराचे प्रथमाचार्य चे मुनिसंघ वेगळे वेगळे असले दिक्षा गुरू वेगळे असले तरी सर्वांचे प्रथमाचार्य शांतीसागरजी हेच आहे त्यांच्यामुळेच दिगंबर मुनि परंपरा अबाधित राहीली असा गौरवपूर्ण उल्लेख केला भिऊ नका संयम पाळा हे एक सुत्र जरी सर्वांनी आत्मसात केले तर निश्चितच सर्वांचं कल्याण होईल अशी भावना व्यक्त केली कार्यक्रमाला पानेगांव,जालना,धुळे,बजाज नगर,अहिल्या नगर, जळगाव, जामखेड,आदि ठिकाणासह शहरातील सर्व भागातील जैन समाज गुरू भक्ताची उपस्थिती होती कार्यक्रम यशस्वीतेसाठी अमोल मोगले, वर्धमान वायकोस, निलेश सावळकर रविंद्र सांगोले प्रकाश भाकरे शेखर वायकोस, दिपक डिकेकर, राजीव कुरकुटे,बाहुबली धोंगडे,विजय मेहेत्रे, बाहुबली बोपलकर, प्रकाश धुमाळ,अजीत गोसावी, प्रकाश दलाल,प्रभाकर गोमटे, प्रगती महिला मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यां आचार्य आर्यनंदि छात्रावास समिती चातुर्मास समिती यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमास दिगंबर क्षीरसागर,राजेंद्र अवतारे, दिलीप डेरे,कुमार नवले,दिलीप संगवे,राहुल जोगी, प्रशांत संघई भास्कर अन्नदाते सुदर्शन महिंद्रकर मुकेश साहुजी विलास साहुजी,वैभव काला ललीत पाटणी शैलेश पहाडे अशोक अजमेरा किरण पहाडे अनील कासलीवाल योगेश दलाल धन्यकुमार शिगरे रमेश घोडके प्रदिप शिंगरे दिपक वायकोस राहुल पाटणी प्रवीण गोसावी अजीत लोहाडे चंद्रशेखर पहाडे प्रकाश अजमेरा अशोक वायकोस अशोक जैन ईगंलवार रविंद्र जमगे वैभव एखंडे अनील क्षीरसागर भालचंद्र जमालपुरे दिपक शिंगरे गणेश खोबरे यांच्यासह सविता गोसावी अर्चना मोगले भारती भाकरे शैलजा सांगोले लता महाजन दिपाली दलाल जयश्री हुडवेकर गीता भाकरे मंगला क्षीरसागर मीनाताई साहुजी शुभांगी इंगलवार सीमा वायकोस सीमा ईगंलवार संगीता पाटणी अल्का पहाडे संगीता गंगवाल शुभांगी एखंडे यांच्या सह हजारो समाज बांधव बंधु भगिनी युवक युवती ची लक्षणीय उपस्थिती होती

---

**भीतीला करा बाय बाय,**

मुंबई : आत्मविश्वास आपल्या जीवनातील महत्त्वाचा पैलू आहे जो यशाचे दार खोलतो. यामुळे आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवण्याचे आणि आपले लक्ष्य गाठण्यास सहाय्य करतो. दरम्यान, काही लोकांमध्ये आत्मविश्वासाची कमतरता असते. ते भीती आणि शंकेने ग्रस्त असतात. तुम्हीही त्यापैकी एक आहात तर खाली दिलेल्या पद्धतीने तुम्ही तुमची भीती दूर करू शकता.

# ५ पद्धतीने वाढवा आत्मविश्वास!



### नकारात्मक विचारांनी राहा दूर

■ आपण अनेकदा नकारात्मक विचारांनी घेरलेलो असतो ज्यामुळे आत्मविश्वास कमी होतो. आपल्या मनात नकारात्मक विचारांना थारा देऊ नका. हे विचार केवळ आपली भीती आणि चिंता वाढवतात. सकारात्मक विचार ठेवा. आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवा.

### आपल्या यशस्वी गोष्टींना आठवा

■ आपण आपल्या आयुष्यात ज्या गोष्टी यशस्वीपणे केल्या आहेत त्या आठवा. यामुळे तुम्हाला प्रेरणा मिळेल. कठीण परिस्थितीशी सामना करण्याचे बळ मिळेल. यामुळे तुम्हाला तुमच्यातील ताकद संपेल.

### लहान लक्ष्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करा

■ मोठे लक्ष्य निर्धारित करण्याऐवजी लहान लहान लक्ष्य प्राप्त करा. लहान लहान लक्ष्य प्राप्त करण्याने आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.

### स्वत:ची काळजी घ्या

■ आपली काळजी स्वत : घ्या. यासाठी चांगले जेवण घ्या. भरपूर पाणी प्या. पुरेशी झोप घ्या आणि नियमितपणे व्यायाम करा. जेव्हा तुम्हाला स्वत :बद्दल चांगले वाटत असेल तेव्हा आत्मविश्वास भरलेला असतो.

### दुसऱ्यांची मदत घ्या

■ जर तुम्हाला आत्मविश्वासाची कमतरता जाणवत असेल तर आपले मित्र अथवा कुटुंबाची मदत घ्या. त्यासाठी संकोच करू नका.

---

# महा जम्बो शब्दकोडे

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | | ■ | ५ | ६ | ■ | ७ | ८ | ■ | ९ | |
| १० | | ■ | ११ | | ■ | १२ | | | १३ | | | १४ | | ■ |
| | ■ | १५ | ■ | १६ | १७ | | | ■ | १८ | | ■ | | ■ | १९ |
| २० | २१ | | | ■ | | ■ | २२ | | ■ | २३ | | ■ | २४ | |
| ■ | २५ | | ■ | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | | ■ | २९ | | |
| ३० | | ■ | ३१ | | ३२ | ■ | ■ | ३३ | | | ३४ | ■ | | ■ |
| ३५ | | | ■ | ३६ | | ३७ | | ■ | | ■ | ३८ | ३९ | ■ | ४० |
| ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ■ | ४४ | ■ | ४५ | | | | |
| | ■ | ४६ | | ४७ | ■ | ४८ | ४९ | | | ■ | ■ | | ■ | |
| ५० | ५१ | ■ | ५२ | | ५३ | ■ | ५४ | | ■ | ५५ | ५६ | ■ | ५७ | |
| ५८ | | ■ | | ■ | ५९ | ६० | ■ | ■ | ६१ | ■ | ६२ | | | ■ |
| ■ | ६३ | | ■ | ६४ | | | ६५ | ६६ | ■ | ६७ | | ■ | ६८ | |
| ६९ | | ■ | ७० | ■ | | ■ | ७१ | | ७२ | ■ | ७३ | ७४ | | ■ |
| | ■ | ७५ | | | ■ | ७६ | ■ | ७७ | | ७८ | ■ | | ■ | ७९ |
| ८० | | | | ■ | ८१ | | | | ■ | ८२ | | | | |

### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

विशेष



## किचनमधील 5 पदार्थ 'अमृता'पेक्षा कमी नाहीत, लिव्हरपासून हार्टपर्यंत व्हाल फिट अँड फाईन

● पान १ वरून . . . झालेल्या अहवालानुसार, आयुर्वेदामध्ये आवळा श्वसन, हृदय आणि संधिवात रोग तसेच मधुमेहाच्या उपचारांमध्ये फायदेशीर असल्याचे म्हटले आहे .

### तूप

आयुर्वेदात तूप हे अत्यंत महत्त्वाचे आणि बहुगुणी अन्न मानले जाते . तुपामुळे पचन सुधारते, तसेच पोषक तत्वांचे शोषण वाढविण्यास तुपाचा फायदा होतो आणि वात असंतुलन कमी करण्यासाठीदेखील तुपाचा वापर करून घेता येतो . तुपाचे अनेक आरोग्यदायी फायदे असून आरोग्यासाठी हे अमृत ठरते .

### हळद

हळद ही अँटीइन्फ्लेमेटरी आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्मांसाठी ओळखली जाते . त्याप्रमाणेच हळद अँटीसेप्टिकदेखील आहे . हळदीचे नियमित सेवन केल्याने पचनक्रिया सुधारते, प्रतिकारशक्ती वाढते आणि शरीर नैसर्गिकरित्या डिटॉक्सिफाय होते असे आयुर्वेदात सांगितले जाते . त्यामुळे प्रत्येक घरात हळदीचा वापर भाजी, आमटी या पदार्थांमधून करणे हेल्दी ठरते .

### मध

आयुर्वेदात मधाला नैसर्गिक अमृत मानले जाते . मधामुळे ऊर्जा मिळते, खोकला, सर्दी यांसारख्या श्वसनाच्या समस्या कमी होतात . तसेच जखमा लवकर भरण्यास मदत होते . रोज अर्धा चमचा मध खाणे नक्कीच चांगले ठरते . त्यामुळे तुम्हाला सर्दी खोकल्याची समस्या असेल तर नियमित याचे सेवन करावे .

### गुळवेल

गुळवेल हे रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या गुणधर्मांसाठी ओळखले जाते . ही आयुर्वेदिक वनस्पती असून यामुळे डायबिटीससारख्या समस्या कमी होण्यास मदत मिळते . तसंच हृदयासाठी याचे सेवन चांगले ठरते . याशिवाय रक्तातील विषारी पदार्थ काढून टाकण्यासदेखील प्रभावी आहे .

## डॉ. मेघाताई डहाळे राष्ट्रीय भारत भूषण पुरस्काराने सन्मानित

● पान १ वरून . . . वाळुंजकर अभिनेते , धाराशिव शिरोळे व्याख्याते व प्रबोधनकार ,प्रमुख पाहुणे विष्णू देशमुख पोलीस सब इन्स्पेक्टर, चित्रा देशमुख बॉलीवुड अभिनेत्री ,भक्ती साधू सिने अभिनेत्री, केतकी गावडे अभिनेत्री, पूजा माळी लावण्यवती, संजय कोटगिरे उच्च न्यायालय नागपूर, हिमांशू जैन सुवर्णपदक विजेते ,प्रा सचिन देवरे सर व्याख्याते व साहित्य, आम्रपाली पारवे व्याख्याते व कवी आधी नामवंत, मान्यवर मंडळी, कलाकार या कार्यक्रमास आवर्जून मोठ्या संख्येने उपस्थित होते .

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आयोजक समितीचे संस्थापक अध्यक्ष सचिन हळदे सर, संस्थापक अध्यक्ष विकास उबाळे , दिपक राणे यांनी अथक परिश्रम घेत मोलाचे सहकार्य केले . यावेळी मा .ॲड . उमाकांत आदमाने कवी साहित्य निवेदक यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन करत सर्वांचे आभार मानले

## गंगापूरला गणपती व ईदच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीची बैठक संपन्न

● पान १ वरून . . . कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज आहे . नागरिकांनी कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार करू नये ; नियमांचे पालन करून सण साजरे करावेत . प्रशासनाशी सहकार्य केल्यास सण अधिक आनंदी आणि सुरक्षित होतील .

तहसीलदार वगवाड यांनीही सांगितले की, "गणेश उत्सव आणि ईद-ए-मिलाद या दोन्ही सणांच्या काळात नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करून सौहार्द जपावे, हीच सर्वांची जबाबदारी आहे .

गंगापूर तहसिल कार्यालयात गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद २०२५ या पारंपरिक सणांच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक पार पडली . दोन्ही सण शांततेत, उत्साहात व सौहार्दपूर्ण वातावरणात साजरे व्हावेत यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना निश्चित करण्यात आल्या .

बैठकीस तहसीलदारनवनाथ वगवाड, प्रभारी तहसीलदारसागर वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारीडॉ . निलेश पालवे, नायब तहसीलदारसचिन वाघमारे, उपनिरीक्षकअनिल झोरे, डॉ . स्वप्नील लगाने, मनोज नवले, नगरपरिषद अधिकारी, विविध धार्मिक संस्था तसेच मंडळांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

बैठकीत मिरवणुकीचे मार्ग, ध्वनीक्षेपकांचा योग्य वापर, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, वीजपुरवठा या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली . यावेळीडिजे वापरास संपूर्ण बंदी असल्याचे स्पष्ट करण्यात आले . पारंपरिक वाद्यांच्या सहाय्यानेच मिरवणुका काढाव्यात, असे प्रशासनाने आवाहन केले .धार्मिक संस्था, मंडळ पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या निर्णयाचे स्वागत केले . "सण हा एकतेचा, बंधुत्वाचा आणि आनंदाचा असतो ; त्याला गोंधळाचे स्वरूप येऊ नये यासाठी नियम पाळणे आवश्यक आहे," असे मत बहुतेक उपस्थितांनी व्यक्त केले .

उपविभागीय पोलीस अधिकारीडॉ . निलेश पालवे यांनी सांगितले की, "गणेश उत्सव आणि ईद-ए-मिलाद या दोन्ही सणांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज आहे . नागरिकांनी कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार करू नये ; नियमांचे पालन करून सण साजरे करावेत . प्रशासनाशी सहकार्य केल्यास सण अधिक आनंदी आणि सुरक्षित होतील ."

तहसीलदार नवनाथ वगवाड यांनीही सांगितले की, "गणेश उत्सव आणि ईद-ए-मिलाद या दोन्ही सणांच्या काळात नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करून सौहार्द जपावे, हीच सर्वांची जबाबदारी आहे .

# पारंपरिक वाद्य वाजवून सण साजरे करा - आ प्रकाश दादा सोळंके

## ➤ डी जे बंद म्हणजे बंदच ➤ गणेश उत्सव व ईद शांततेत साजरी करा - पो नी राहुल सुर्यतळ

➤ माजलगाव : अरविंद ओव्हाळ

आरोग्यास अतिशय घातक असलेल्या डी जे बाजूला सारून पारंपरिक वाद्यांनी सर्व सन उत्सव साजरे करा असे आव्हान आ प्रकाशदादा सोळंके यांनी तर शासनाने डी जे वर बंदी घातली असून सर्व गणेश मंडळाने याचे काटेकोर पालन करावे डी जे बंद म्हणजे बंदच राहणार आहेत येणारा गणेशोत्सव व ईद ए मिलाद सर्व नागरिकांनी शांततेत व उत्साहात साजरे करावे असे आव्हान शहर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी शांतता समितीच्या बैठक प्रसंगी सर्व नागरिकांना केले .





येणाऱ्या गणेशोत्सव व ईद- ए - मिलाद या सणांच्या पार्श्वभूमीवर माजलगाव शहर पोलीस स्टेशनच्या वतीने लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालयात सोमवारी आयोजित केली होती या बैठकीला माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके ,उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश गायकवाड , ना तहसीलदार लक्षीमन धस ,एमएसइबी चे कार्यकारी उपअभियंता विजयकुमार वसावे ,न प चे विग्नेश मुंडे आदी ची प्रमुख उपस्थिती होते .

या वेळी नागरिकांनी विचारले काही प्रश्नांवर बोलताना आ प्रकाश दादा सोळंके म्हणाले की ,शहरा सह परिसरातील अवैद्य धंदे पूर्णपणे बंद आहे त्या मुळे सर्वत्र शांतता आहे समाजाने ठरवलं तर सर्व अवैद्य धंदे बंद होऊ शकतो शहरातील नाल्या ,रोडवरील लाईट ,रस्ते आदी सर्व कामे पूर्ण करण्याच्या मी अगोदरच त्या त्या विभागाला सूचना केल्या आहेत सद्याचा तरुण दिशाहीन झाला आहे डी जे चे फ्याड त्यांच्या डोक्यात आहे डी जे मुळे वृद्ध नागरी ,लहान मुले यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन अनेकदा दुर्दैवी घटना घडत आहेत त्या मुळे सण उत्सवाच्या वेळी पारंपरिक वाद्य वाजवून सन साजरे करण्याची गरज आहे तर शहर पोलीस स्टेशन चे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी राहुल सुर्यतळ यांनी काही सूचना केल्या बीड चे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात डी जे वाजवण्यास बंदी आहे डी जे बंद म्हणजे बंद त्या मुळे कोनीही याचे उल्लंघन करणार नाही याची खबरदारी घ्यावी गणेश मंडळांनी दोन समाजात तेड निर्माण होईल अशी कुठलेही कृत्य करू नये गणेशोत्सव व ईद ए मिलाद हे येणारे सन आनंदाने साजरे करा व कायदा आणि सु - व्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सर्व नागरिकांनी नेहमी सारखे सहकार्य करावे . काल शांतता समितीच्या वतीने तालुक्यातील नीट मध्ये यश संपादन करून उतुंग भरारी घेऊन आपल्या पालकांचे व तालुक्याचे नाव उंचावणाऱ्या अकरा यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा आ प्रकाश सोळंके व उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश गायवाड यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला . या शांतता समिती च्या बैठकीला जयदत्त नरवडे ,अच्युतराव लाटे, सलीम बापू , कचरू तात्या खळगे, डॉ मुजीब सौदागर ,धम्मानंद साळवे आदी सह शहरातील सर्व जाती धर्माचे नागरिक व गणेश मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार पीएसआय प्रबतराव मुंढे यांनी व्यक्त केले .

# गणेशपुर जि. प. प्राथमिक शाळेत बाल संसद निवडणूक

## मुख्यमंत्री निवडणुकीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना लोकशाहीचा अभ्यास शाळेचा सुंदर उपक्रम

➤ चिंचोली लिंबाची : सचिन गुरव

कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी येथून जवळ असलेल्या गणेशपुर येथे आज जी प्रशाला गणेशपुर या शाळेत बाल संसद या निवडणुकीचे आयोजन करण्यात आलं होतं . लोकशाही पद्धतीने उमेदवार अर्ज मागे घेणे दाखल करणे प्रचार करणे

लोकशाही पद्धतीने निवडणूक कशी होती यासाठी गणेशपुर येथील जिल्हा प्राथमिक शाळेत सुंदर असा हा उपक्रम राबवण्यात आला

याप्रसंगी केंद्र प्रमुख कौतिक सपकाळ, केंद्रीय मुख्याध्यापक रमेश सोळुंके सर , मुख्याध्यापक एस के चव्हाण, शालेय समिती अध्यक्ष संदीप भैय्या सोळुंके पाटील, यांच्या उपस्थितीत

प्रत्यक्ष मतदान घेऊन यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात आला शाळेतील तंत्रस्नेही शिक्षक श्री सवाल सर, श्री राऊत सर श्री व्यवहारे सर ,श्रीमती सोनवणे मॅडम, चित्रा चंदवाडे मॅडम ,प्रत्यक्ष वोटिंग मशीन शाळेतील टॅबलेट वर साकारून मुलांना प्रात्यक्षिक दाखवून प्रत्यक्ष मतदान कशाप्रकारे होते याची ओळख देऊन शाळेत टॅबवर ॲप द्वारे तसेच मतदान करण्यासाठी मतदान कक्ष स्थापन करण्यात आले शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री संदीप सोळुंके यांनी मतदान कक्षाचे अध्यक्ष स्थान





स्वीकारले तसेच शालेय शिक्षक यांनी अधिक अधिकारी क्रमांक एक ते अधिकारी क्रमांक तीन पर्यंत सर्व कार्य पार पाडले

असा अनोखा निवडणुकीचा अभ्यास असाच खेळत जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना घडवला तो शाळेच्या मुख्याध्यापकांनी याबद्दल परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे .

या बाल संसद निवडणुकीत श्रुती संदीप महाले ही विद्यार्थिनी 39 मतांनी प्रथम क्रमांकावर विजयी झाली तर ती आता गणेशपुर प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणजेच मुख्यमंत्री म्हणून काम बघेल तिला सहकारी चार विद्यार्थी म्हणजे चार मंत्री असतील असा हा उपक्रम गणेशपुर शाळेत संपन्न झाला

# सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट चॅम्पियन्स स्पर्धेत माजलगावची ३०, पदकांची कमाई - मास्टर माजेद सर

➤ माजलगाव : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथे दि .२४ ऑगस्ट २०२५ वार रविवार रोजी पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय खुले कराटे चॅम्पियनशिप मध्ये सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट अकॅडमी माजलगाव चे १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता या स्पर्धांमध्ये श्रीलंकासह विदेशातून व आपल्या देशातून एकूण ३७५ विद्यार्थी सहभाग झाले होते . या सर्व सर्व खेळाडू मधून आपल्या माजलगावच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा इतिहास घडवला आहे व दोन वेळेस आंतरराष्ट्रीय स्पर्धा मध्ये चॅम्पियनस टीम होण्याचा बहुमान प्राप्त केला आहे .




( काता . व कुमिते ) या दोन्ही प्रकारामध्ये विद्यार्थ्यांनी १७ स्वर्ण पदक ७ रजत पदक ६ कांस्य पदक असे एकूण ३० पदका ची कमाई केली यामध्ये विद्यार्थी विद्यार्थिनीमध्ये कु . भैरवी गोरे , भक्ती कोल्हे, श्रावणी मुजमुले, व विद्यार्थ्यात प्रेम काठोळे, रोहित धारक, मयूर कंकाळ,उदय ढेरे, अर्कम शेख, अफान शेख, आयान शेख, साद शेख, अर्शद सय्यद, साद सय्यद, गोविंद ढगे, वैभव साळवे ,हे सर्व विद्यार्थी पुन्हा एकदा चॅम्पियन्स ठरले व या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शक रेन्शी माजेद शेख सर .( बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर ) यांनी मार्गदर्शन केले .

यांच्या यशाबद्दल महाराष्ट्र पत्रकार संघाचे अनंत घडसिंगे , वाजेद पठाण , शेख मुजफ्फर , मच्छिंद्र उफाडे, परमेश्वर चांदणे सह अनेकांनी त्याचे स्वागत केले . व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत . या यशाबद्दल माजलगाव सह जिल्ह्यातून या गुणवंत विद्यार्थ्यावर कौतुकाची थाप पडत आहे .

# मराठा आणि कुणबी एकच आरक्षण आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हा - ॲड. प्रमोद तौर

माजलगाव / प्रतिनिधी :

महाराष्ट्रातील मराठ्यांना आरक्षण मिळावे यासाठी गेली दोन वर्षापासून संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे सरकारशी संघर्ष करत आहेत . परंतु सरकार आरक्षणा बाबत सकारात्मक विचार न करता वेळ काढूपणा करत आहे . प्रत्येक वेळी शिष्टमंडळ पाठवून जरांगे पाटलांच्या उपो-षणाला खोटी आश्वासन देवून दिशाभूल केली जाते आहे . न्याय हक्कासाठी एक पाऊल मागे घेऊन परत मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोठी झेप घ्यायची आहे .



मराठा समाजाला सरसकट ओबीसी मधून आरक्षण मिळावे याकरिता २९ ऑगस्ट रोजी मुंबईत आंदोलन होत आहे . या आंदोलनात मराठा समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ( अजित पवार गट ) माजलगाव तालुका सरचिटणीस ऑड प्रमोद तौर यांनी केले आहे .

राज्यामध्ये मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनामुळे लाखो कुणबी प्रमाणपत्र मिळाले . या प्रमाणपत्राचा फायदा मराठा समाजातील मुला-मुलींना शिक्षण व नोकऱ्यांमध्ये होताना दिसत आहे . स्पर्धेच्या युगात मराठा समाजाचे मुलं मुली शासकीय सेवेत नोकरीला लागत आहेत . महाराष्ट्र राज्यातील सर्वच मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी व मराठा समाजाला प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सदरील लढा चालू आहे . शेतकरी शेतमजूर सर्वांनी आपली कामे बाजूला ठेवून मुला मुलींच्या भवितव्यासाठी २९ ऑगस्ट रोजी जरांगे पाटलांच्या नेतृत्वात होत असलेल्या आंदोलनात मराठा समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे तसेच मराठा आणि कुणबी हे एकच असून या मराठा आरक्षण लढ्यास मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन ऑड प्रमोद तौर यांनी केले आहे .

# नगर परिषद गणेशोत्सव दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दणक्यात होणार साजरा - अक्षय धारक

## ➤ विविध उपक्रमांची रेलचेल; गणेशोत्सव दणक्यात साजरा होणार

➤ माजलगाव : प्रतिनिधी

येथील नगरपरिषद कर्मचारी मंडळाच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सव साजरा करण्यात येतो स्थापनेच्या आणि विसर्जनाच्या दिवशी खास आकर्षक मिरवणूक असा पायंडा असल्याने याही वर्षी गणेशोत्सव अगदी दणक्यात साजरा होणार असल्याची माहिती अध्यक्ष अक्षय धारक यांनी दिली .



नगरपरिषद गणेशोत्सवामध्ये विविध उपक्रमांची रेलचेल गणेशोत्सवा निमित्त असल्याने त्यासाठी सक्षम कार्यकारिणी देखील जाहीर करण्यात आली असून नगर परिषद गणेश मंडळ कार्यकरणी जाहीर उपाध्यक्ष विशाल अच्युतराव टाकणखार , सचिव विघ्नेश रत्नाकर मुंडे , कोषाध्यक्ष अनंत वाघमारे सदस्य शिवहर शेटे , आयुब पठाण, विलेश कांबळे, संकेत साळवे, सागर उजगरे, सागर मिसाळ, फुने, दिवाळकर, मामडे, मुंडे, केंद्रे, गित्ते, महेश धर्माधिकारी, सुधाकर उजगरे, सखाराम हाके, वेदांत जोशी, सुमेध साळवे आदींचा समावेश आहे .

कार्यवाहीचा बडगा ➤ महसूल व पोलीस अधिकारी यांच्या कडून वाळू माफियांनी दहशत मोडीस

# सांडस चिंचोली ची चोरटी वाहतूक कायमची बंद

➤ माजलगाव : अरविंद ओव्हाळ

तालुक्यातील सांडस चिंचोली परीसरात मागील काही दिवसापासून अवैध वाळु उपसा करणाऱ्या वाळु माफीयांनी नदी पात्रात अक्षरश: दहशत घातली होती व त्या दहशती खाली गावातील नागरिक होते, त्यांच्या वाहनाने संपूर्ण रस्त्याची वाट लागून रस्ता खड्डे मय झाला होता त्या मुळे गावातील लोकांनी या विषयी



बालक कोळी , पोलीस निरीक्षक , ग्रामीण



लक्ष्मन धस , महसूल अधिकारी तहसील

वारंवार निवेदने व तोंडी कळवून ही कुठल्याही प्रकारची ठोस कार्यवाही होत नसल्याने या वाळू माफियाने हैदोस घातला होता या वर प्रतिबंध घालून या वाळू चोरांचा कायमचा



बंदोबस्त व्हाया या साठी उपसरपंच यांनी ग्रामसेवक व तलाठी याच्या सह या प्रकरणी शनीवार दिनांक २३ तारखेला निवेदन दिले होते .

या वर काल दि २५ रोजी ग्रामीण पोलीस स्टेशन चे पि .आय बालक कोळी व तहसील कार्यालया माजलगाव चे धस साहेबांना, यांनी तात्काळ दखल घेऊन अवैध वाळु उपसा संदर्भात तात्काळ नदीत जाणारे रस्ते खोदून काढण्यात आले या मुळे आता या वाळू चोरांचा बंदोबस्त झाला आहे

ही सर्व कार्यवाही पि .आय .कोळी ,नायब तहसीलदार धस ,पथक प्रमुख भट्टे ,तलाठी चंदेल ,ग्रामसेवक राउत , उपसरपंच शुभम भोसले ,ग्रामस्थ नारायण शेजुळ यांनी वाळु माफीयांची दहशत मोडीत काढत वाळु उपसा प्रतिबंधीत केल्याने संपूर्ण गावकऱ्यांनी सुटकेचा श्वास घेतला आहे .

## सौ राजकुंवर ढोले याचे निधन

छत्रपती संभाजी नगर : येथिल खंडेलवाल दिगम्बर जैन महिला मंडलाच्या माजी अध्यक्षा, सामाजिक कार्यकर्त्य सौ राजकुंवर रमनलालजी ढोले ( 74 वर्ष ) सज्जनपुर कसाबखेडेकर कुंवारफल्ली ह्यांचे शुक्रवारी मध्य रात्रि अल्पशा आजाराने दुखद निधन झाले .



त्यांच्या पश्चात् पति, मुलगा नरेश, दोन विवाहित मूली असा मोठा परिवार आहे . शनिवारी दूपारी त्यांच्या पार्थिवावार कैलाश नगर स्मशान भूमि येथे अंत्य संस्कार करण्यात आले .